# इयत्ता 11 वी केंद्रिय प्रवेश समिती पुणे 2015-16

## प्रसिद्धी निवेदन

दि.08.6.2015

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता ११ वी प्रवेश सन १९९६-९७ पासून केंद्रिय प्रवेश पद्धतीने केले जात आहेत. सदरची प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र राज्यामध्ये पुणे शहरात पहिल्यांदाच सुरु करण्यात आली होती. केंद्रिय प्रवेश पद्धतीने प्रवेश देण्याचे हे वीसावे (२० वे) वर्ष आहे. गतवर्षीप्रमाणेच सन २०१५-१६ शैक्षणिक वर्षातील इयत्ता ११वी चे प्रवेश ऑनलाईन केंद्रिय पद्धतीने करण्यात येत आहे.

सन २०१५-१६ या वर्षी पासून इ.११ वीचे प्रवेश ऑनलाईन पद्धतीने केले जात आहेत. इ.११ वी प्रवेश ऑनलाईन प्रवेश पद्धतीने करण्यामुळे विद्यार्थ्यांना अर्ज घेण्यासाठी व अर्ज सादर करण्यासाठी स्वीकृती केंद्रावर जावे लागले नाही. त्याऐवजी त्यांना प्रवेश अर्ज स्वतःच्या घरी किंवा शाळेमध्ये बसून ऑनलाईन पद्धतीने करता आला त्यामुळे इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे श्रम, पैसा व वेळ वाचला हे नक्कीच.

प्रवेश प्रक्रियेसाठी एकूण नऊ झोन तयार करण्यात आलेले आहेत. प्रत्येक झोनमध्ये झोन प्रमुख, झोन सहाय्यक व एक पर्यवेक्षिय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली असून सदर नऊ झोनमधील एकूण २६ मार्गदर्शन केंद्रावर ५५ संपर्क प्रमुख कार्यरत आहेत.

इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेद्वारा कला,विज्ञान व वाणिज्य या शाखेत प्रवेश दिले जाणार आहेत.

- **खालील प्रवेश ऑनलाईन पद्धतीने न होता संबंधित कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरुन केले जातील.**

अ) किमान कौशल्यावर आधारीत व्यावसायिक अभ्यासक्रम **{HSC-VOCATIONAL (MCVC)}**, ब) गृहनिर्माण **(Home Science)**, क) व्यवस्थापन, अल्पसंख्याक व इनहाऊस कोट्याचे प्रवेश, ड) तांत्रिक कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेश, इ) रात्र कनिष्ठ महाविद्यालयीन प्रवेश, फ) हिंदी व उर्दू माध्यमाचे उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेश.

- **प्रवेश संदर्भात महत्त्वाच्या सुचनाः**

1. प्रवेश अर्जातील पार्ट-1 व पार्ट-2 भरुन झाल्यानंतर Submit/Confirm बटन प्रेस केल्यानंतरच आपला ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रिया पुर्ण होईल याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
2. एकूण प्रवेश टप्प्यानूसार तीन गुणवत्ता याद्या जाहीर करण्यात येणार आहे. या गुणवत्ता याद्या तयार करताना विद्यार्थ्यांची गुणवत्ता व आरक्षण तसेच विद्यार्थ्यांनी उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा निवडलेला पसंतीक्रम त्या संबंधित कॉलेजच्या कटऑफसह विचारात घेण्यात येईल.
3. विद्यार्थ्यांच्या पसंतीक्रमानूसार व गुणवत्तेनूसार मिळालेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेश विहीत कालावधीत घेणे अत्यावश्यक आहे. सदर प्रवेश न घेतल्यास त्याचे/तिचे नांव प्रवेश प्रक्रियेमधून आपोआप वगळले जाईल व सदर विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेतून पूर्णतः बाहेर जाईल याची पालक व विद्यार्थी यांनी नोंद घ्यावी.
4. ज्या विद्यार्थ्यांनी दोन शाखासाठी अर्ज केला असेल तर प्राधान्यक्रम देताना दोन्ही गटांमध्ये प्रत्येक शाखेसाठी किमान १ पसंतीक्रम देणे आवश्यक आहे. कोणत्याही शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना संपूर्ण प्रवेश प्रक्रियेदरम्यान बेटरमेंटच्या (उन्नत प्रवेशाच्या) **दोन** संधी उपलब्ध राहतील. ही संधी विद्यार्थ्याने त्यांच्या प्रवेश अर्जात नमूद केलेल्या पसंतीक्रमाच्या चढत्या क्रमानूसार असेल. पहिली बेटरमेंट घेतल्यानंतरच विद्यार्थी दूसऱ्या बेटरमेंटला पात्र राहतील. तसेच सर्व विद्यार्थ्यांना बेटरमेंट मिळेलच असे नाही. याची नोंद घ्यावी.
5. फॉर्ममध्ये पसंतीक्रम सोडून इतर काही दुरुस्ती करावयाची असल्यास विद्यार्थ्यांनी संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकांकडून/मार्गदर्शन केंद्रावरुन करावी.
6. प्रत्येक झोन प्रमुख व झोनमधील मार्गदर्शन केंद्रे विद्यार्थ्यांना त्यांच्या तक्रारी व शंकांबाबत मार्गदर्शन करतील.
7. तिसऱ्या फेरीचे प्रवेश झाल्यानंतर संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या वैकल्पिक भाषा, विषय व द्विलक्षी अभ्यासक्रमातील विषयांचे (बायाफोकल) प्रवेश विद्यार्थ्यांची मागणी व गुणवत्तेनूसार संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्तरावरुन केले जातील.

| अ.क्र | शाखा/माध्यमनिहाय कॉलेज संख्या व प्रवेश क्षमता | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शाखा | कला | | | वाणिज्य | | | विज्ञान | | | एकूण |
| २ | माध्यम | मराठी | इंग्रजी | एकूण | मराठी | इंग्रजी | एकूण | मराठी | इंग्रजी | एकूण | |
| ५ | कॉलेज संख्या | 75 | 32 | 107 | 110 | 118 | 228 | 0 | 195 | 195 | 218/530 |
| ६ | विद्यार्थी संख्या | 8260 | 3140 | 11400 | 12540 | 17815 | 30355 | 0 | 30350 | 30350 | 72105 |

# प्रवेश अर्ज भरताना व प्रवेश घेतेवेळी घ्यावयाची दक्षता.

## टप्पा-१ ( प्रवेश अर्ज )

- आपल्या शाळेतून माहितीपुस्तिका खरेदी करा व शाळेतील शिक्षकांकडून प्रवेश प्रक्रिया समजून घ्या.
- नमूना अर्ज भरण्यापूर्वी माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचा.
- माहिती पुस्तिकेमध्ये लॉगिन आयडी आणि पासवर्ड शोधा.
- **http://pune.fyjc.org.in** या वेबसाईटवर जा.
- पहिल्यांदा लॉगिन करण्यासाठी माहितीपुस्तिकेमध्ये दिलेला लॉगिन आयडी आणि पासवर्ड वापरा.
- पासवर्ड बदला आणि पुढच्या वेळेस लॉगिन करण्यासाठी लक्षात ठेवा.
- सिक्युरिटी प्रश्न निवडुन तसेच त्याची योग्य उत्तरे लक्षात ठेवा.
- संगणकावर दिलेल्या सुचना पाळून टप्प्याटप्प्याने ऑनलाईन अर्ज भरा.
- 'कन्फर्म' या बटनावर क्लिक करुन आपला अर्ज निश्चित करा.
- ज्या अर्जदारांच्या माहितीमध्ये काही त्रुटी असतील अथवा काही दुरुस्ती करावयाची असेल त्यांनी आपला अर्ज आणि सादर करावयाची कागदपत्रे आपल्या शाळेकडुन मान्यताप्राप्त करुन घ्यावीत.
- खुल्या संवर्गाव्यतिरिक्त महाराष्ट्रातील वैधानिक आणि/अथवा विशेष आरक्षणांतर्गत अर्ज करणाऱ्या अर्जदारांनी आपला अर्ज आणि सादर करावयाची कागदपत्रे आपल्या शाळेकडून मान्यताप्राप्त करुन घ्या.

## टप्पा - २ (पसंतीक्रम अर्ज)

- पसंतीक्रम निश्चित करताना शाळा / कॉलेजचे गेल्यावर्षीचे कट ऑफ, आपणास मिळालेले गुण, शाखा, अनुदानित/विनाअनुदानित, माध्यम, शिकविले जाणारे वैकल्पिक विषय याचा साकल्याने विचार व्हावा.
- प्रवेश घ्यावयाच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालचा पसंतीक्रम (कॉलेज कोड नीट तपासणे) निश्चित करा.
- निश्चित केलेल्या पसंती क्रमाचा प्राधान्यक्रम ठरवून कॉलेज कोड अर्जात भरा.
- कॉलेज कोड भरताना चुका करु नका.
- पार्ट-२ फॉर्म भरुन झाल्यानंतर Submit/Confirm बटन प्रेस करणे अत्यंत आवश्यक आहे. तेव्हाच फॉर्म ऑनलाईन पूर्ण झाला असे म्हणता येईल.

## टप्पा - ३ (प्रवेश प्रक्रिया)

- निकाल जाहीर झाल्यावर पहिली गुणवत्ता यादी जाहीर.
- ज्या महाविद्यालयासाठी आपले नाव गुणवत्ता यादीत आले असेल, त्या महाविद्यालयात आपला प्रवेश निश्चित करा.(केवळ फक्त रु.५०/- फी भरुन)
- पहिल्यांदा प्रवेश निश्चित केल्यानंतर आपल्याला पुढील फेरीतील गुणवत्ता यादीमध्ये एक बेटरमेंटची संधी उपलब्ध होते आहे का? हे तपासण्यात येईल.
- जर आपले नाव कुठल्याच महाविद्यालयासाठी पहिल्या गुणवत्ता यादीत आले नसेल, तर पुढच्या गुणवत्ता यादीची वाट पहा.
- जर एखाद्या महाविद्यालयासाठी आपले नाव गुणवत्ता यादीत आले असेल आणि तरीसुद्धा आपण त्या महाविद्यालयात आपला प्रवेश निश्चित केला नाही, तर आपण ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या बाहेर जाल.
- क्रमशः दूसरी व तिसरी गुणवत्ता यादी जाहीर.
  पुढील बेटरमेंट फेऱ्यांमध्ये आपल्याला आपल्या पसंतीक्रमानुसार वरचे महाविद्यालय उपलब्ध झाल्यास आधी प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयामधून आपला प्रवेश रद्द करा आणि नविन महाविद्यालयात आपला प्रवेश निश्चित करा.

# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१५-१६

**पुणे व पिंपरी -चिंचवड मनपा क्षेत्रातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील इ.११ वी च्या विदयार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत.**

## वेळापत्रक

| अ.क्र. | दिनांक | वेळ | प्रवेश प्रक्रियेबाबत तपशिल |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| **१** | **८ जुन २०१५** | **---** | **इयत्ता १० वी चा निकाल ऑनलाईन प्रसिध्द** |
| २ | ९ जुन २०१५ ते १८ जुन २०१५ | सायं. ५.०० वाजपर्यंत | ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे (पार्ट १ अपूर्ण राहिलेला भाग पूर्ण भरणे व भरालेला नसल्यास पार्ट १ सह पार्ट २ भरणे) तसेच यापूर्वी भरलेल्या ऑनलाईन प्रवेश अर्जातील आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यामार्फत ऑनलाईन दुरुस्ती. |
| ३ | १५ जुन २०१५ ते १८ जुन २०१५ | सायं. ५.०० वाजपर्यंत | उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरील इन हाऊस कोटा, अल्पसंख्यांक कोटा प्रवेश प्रक्रिया करणे व भरलेल्या जागा ऑनलाईन पध्दतीने संगणकीय एजन्सीला कळविणे. |
| ४ | २४ जुन २०१५ | सायं. ५.०० वाजता | पहिली गुणवत्ता यादी जाहीर करणे. |
| ५ | २५, २६ व २७ जुन २०१५ | स. १०.०० ते ४.०० | प्रथम गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे. |
| ६ | २७ जुन २०१५ | सायं ५.३० वाजेपर्यंत | उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरील इनहाऊस कोटा, व्यवस्थापन कोटयातील रिक्त जागा गुणवत्ता यादी-२ साठी ऑनलाईन पध्दतीने संगणकीय एजन्सीला कळविणे. |
| ७ | २ जुलै २०१५ | सकाळी.११.०० वाजता | दुसरी गुणवत्ता यादी जाहीर करणे. |
| ८ | २, ३, ४ जुलै २०१५ | स. ११.०० ते ४.०० | दुस-या गुणवत्ता यादीनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देणे. |
| ९ | ४ जुलै २०१५ | सायं ५.३० वाजेपर्यंत | उच्च माध्यमिक विद्यालय/कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरील इनहाऊस कोटा, व्यवस्थापन कोटा व अल्पसख्यांक कोटयातील रिक्त जागा गुणवत्ता यादी-३ साठी ऑनलाईन पध्दतीने संगणकीय एजन्सीला कळविणे.( प्रत्यार्पित (Surrender) करणे. |
| १० | ९ जुलै २०१५ | सकाळी.११.०० वाजता | तिसरी गुणवत्ता यादी जाहीर करणे. |
| ११ | ९,१० जुलै २०१५ | स. ११.०० ते ४.०० | तिस-या गुणवत्ता यादीनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देणे. |
| १२ | ११ जुलै २०१५ ते १४ जुलै २०१५ | स. १०.०० ते ४.०० | प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयाची पूर्ण फी भरुन त्यांचे प्रवेश निश्चित करणे. |
| **१३** | **१५ जुलै २०१५** | **इयत्ता ११ वी साठीचे प्रत्यक्ष अध्यापनाचे काम सुरु करणे.** | |

ज्या उच्च माध्यमिक विद्यालय/ कनिष्ठ महाविद्यालयांना अल्पसंख्यांक कोटा, व्यवस्थापन कोटयातील जागा केंद्रिय प्रवेश समितीला प्रत्यार्पित (Surrender) करावयाच्या आहे. अशी त्यांनी ऑनलाईन पध्दतीने जागा प्रत्यार्पित (Surrender)करु शकतील. एटीकेटीच्या प्रवेशाचे वेळापत्रक यथावकाश जाहिर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| (डॉ. श्रीकांत गुप्ता) | (मीनाक्षी राऊत) | (रामचंद्र जाधव) |
| कार्याध्यक्ष, | सचिव, | अध्यक्ष, |
| इ. ११ वी केंद्रिय प्रवेश समिती | इ. ११ वी केंद्रिय प्रवेश समिती | इ. ११ वी केंद्रिय प्रवेश समिती |
| तथा प्राचार्य, | तथा | तथा |
| आबासाहेब गरवारे महाविद्यालय, | प्र.सहाय्यक शिक्षण संचालक | शिक्षण उपसंचालक |
| कर्वेरोड, पुणे | पुणे विभाग, पुणे | पुणे विभाग, पुणे |